प्रेस नोट क्रमांक. २४/२०२५
स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, सांगली
दिंनाक २१.०२.२०२५

प्रेस नोट

# मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांचा सांगली दौरा

मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर श्री. सुनिल फुलारी सर हे दि. २०/०२/२०२५ ते दि. २५/०२/२०२५ चे दरम्यान सांगली पोलीस दलाचे वार्षिक निरीक्षण/तपासणी अनुषंगाने सांगली जिल्हा दौऱ्यावर आहेत.

तरी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर यांनी दि. २०/०२/२०२५ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, शहर विभाग, सांगली व महात्मा गांधी चौक पोलीस ठाणे, मिरज तसेच दि. २१/०२/२०२५ रोजीचे उपविभागीय पोलीस अधिकारी, तासगाव विभाग, तासगाव व तासगाव पोलीस ठाणे यांची वार्षिक तपासणी घेण्यात आलेली आहे. वार्षिक तपासणी दरम्यान घडलेले गुन्हे व केलेल्या कारवाया याबाबत आढावा घेऊन मार्गदर्शन व सुचना दिल्या.

वर नमूद ठिकाणी मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर श्री. सुनिल फुलारी सर यांना भेटण्यासाठी मोठया संख्येने नागरीक आले होते. काही नागरिकांनी सरांना भेटून त्यांच्या अडीअडचणी व समस्या मांडल्या. त्या समस्याचे निरसन करणेबाबत सरांनी संबंधित अधिकारी यांना तात्काळ आदेश दिले.

तसेच मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर श्री. सुनिल फुलारी सर यांना दुसऱ्यांदा राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याने मोठया प्रमाणात नागरिकांनी भेटून सरांचे अभिनंदन केले.

Scanned with CamScanner